# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

## ◂◂◂ ■ कंत्राटी पदभरती जाहिरात ■ ▸▸▸

**जाहिरात क्रमांक : रातुमनावि/सा.प्र./६६७** **दिनांक : १० डिसेंबर, २०१८**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात **कंत्राटी पद्धतीवर तात्पुरत्या स्वरूपात ११ महिन्याच्या कालावधीकरिता** खालील पद भरावयाचे आहे.

| पदनाम | पदसंख्या | दरमहा वेतन |
|---|---|---|
| **Photographer-cum-Curator** (On Contract basis) **छायाचित्रकार-नि-संग्रहालय प्रमुख** (कंत्राटी पद्धतीवर) | ०१ | रू.१८,०००/- |

त्यानुसार, संबंधितांकडून सदर पदाकरिता आवेदनपत्र मागविण्यात येत आहे.

वरील पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय, पात्रतेच्या इतर निकषासंबंधीची विस्तृत माहिती आणि अर्जाचा विहित नमुना विद्यापीठाच्या **www.nagpuruniversity.org** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

करिता, इच्छुक अर्जदारांनी जाहिरातीत नमूद सर्वसाधारण सुचनांचे लक्षपूर्वक वाचन करून पात्रतेच्या बाबींची पूर्तता करीत असल्यास विहित नमुन्यात माहिती भरून आवश्यक सहपत्रांसह एकूण **पाच प्रतीत** आपला अर्ज विद्यापीठात **दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ रोजी सायं ५.०० वाजेपर्यंत** सादर करावा.

## **“Photographer-cum-Curator”** (On Contract basis)
## या पदाच्या पात्रतेचे निकष

**शैक्षणिक अर्हता :-**

**डिप्लोमा होल्डर इन फोटोग्राफी ॲण्ड कमर्शियल आर्टस/फाईन आर्टस सर्टिफिकेट कोर्स परीक्षा उत्तीर्ण किंवा डिप्लोमा इन आर्ट टिचर (ए.टी.डी.) कोर्स परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.**

**अनुभव :-**

**शैक्षणिक/औद्योगिक/शासकीय संस्थेमधील कृष्णधवल व रंगीत छायाचित्रणाचा/चित्रीकरणाच्या प्रत्यक्ष कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव आवश्यक आहे.**

**प्राधान्य :-**

१. मान्यताप्राप्त विद्यापीठाची ललित कला, इतिहास, वास्तुशास्त्र, संग्रहालय अभ्यास हया किंवा तत्सम विषयातील पदवी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

२. मायक्रो फोटोग्राफी प्रिपरेशन ट्रान्सपरन्सी कामाचा अनुभव/चित्रकला परीक्षा उत्तीर्ण असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

**वयोमर्यादा :-**

**सर्व उमेदवारांसाठी किमान वयोमर्यादा १८ वर्षे असून खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे आणि मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे राहील.**

## अर्जदारांसाठी सर्वसाधारण सूचना

उमेदवारांनी आपले अर्ज भरण्यापूर्वी त्यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय, इत्यादी बाबी पडताळून पाहाव्यात. तसेच खालील सूचना व अटींचे लक्षपूर्वक वाचन करावे.

१) सदर पदासाठी उमेदवारास **मराठी भाषेचे ज्ञान** असणे आवश्यक आहे.

२) आवेदकांनी विद्यापीठाच्या **www.nagpuruniversity.org** या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यामध्येच टंकलिखित, हस्तलिखित किंवा संगणकीय प्रिंट केलेला अर्ज (परिपूर्ण भरलेला अर्जाचा नमुना व संबंधित प्रमाणपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती) एकूण **पाच प्रतीत** सादर करावा. विहित नमुन्यातील अनुक्रमांकामध्ये/रकान्यामध्ये कुठलाही बदल करू नये. अर्ज भरतांना रकाने किंवा ओळी कमी पडत असल्यास अधिकची माहिती स्वतंत्र कागदावर द्यावी व तसे अर्जात योग्य त्या ठिकाणी नमूद करावे. **अर्जदाराने आवेदनपत्रातील "प्रपत्र-अ" मध्ये माहिती भरणे अत्यावश्यक आहे. सदर प्रपत्रात माहिती सादर न केल्यास अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.**

३) अर्जदाराने अर्जाच्या **किमान दोन प्रतीत** विहित नमुन्यात दर्शविलेल्या स्थानी स्वत:चा स्वसाक्षांकित केलेला फोटो चिटकवावा.

४) पात्र ठरणाऱ्या उमेदवारास मुलाखतीसाठी स्वतंत्रपणे पत्रव्यवहार केला जाईल.

५) अर्जासोबत शैक्षणिक, अनुभव, वय, जात, जातवैधता, इत्यादी आवश्यक व लागू असलेल्या प्रमाणपत्रांच्या छायांकित व स्वसाक्षांकित प्रती जोडाव्यात. **अर्जासोबत मुळ प्रमाणपत्रे जोडू नयेत.**

६) अर्जदाराने आपला अर्ज सर्व दस्तावेजांसह लिफाफ्यात भरून **“Photographer-cum-Curator”** (On Contract basis) **या पदासाठी अर्ज** असे लिफाफ्यावर लिहून **"मा. कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परीसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, महाराजबाग जवळ, अमरावती रोड, नागपूर - ४४० ००१"** या पत्त्यावर **दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ रोजी सायं ५.०० वाजेपर्यंत**

पोहचेल अशा बेताने पाठवावे. यानंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा कुठल्याही परिस्थितीत विचार केल्या जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

७) सुवाच्च्य अक्षरात नसलेले, अपूर्ण, चुकीची माहिती भरलेले, विहित नमुन्यात नसलेले, आवश्यक शैक्षणिक अहर्ता व अनुभव धारण करीत नसलेले, वयोमर्यादेत मोडत नसलेले, अर्जासोबत अर्हता, अनुभव, वय, इत्यादी लागू असलेल्या प्रमाणपत्रांच्या छायांकित व स्वसाक्षांकित नसलेल्या प्रती जोडलेले अर्ज, टपालखात्याच्या दिरंगाईमुळे अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव उशीरा प्राप्त झालेले, इत्यादी त्रुटी असलेले अर्ज तसेच सर्व प्रमाणपत्रांसह पाच प्रतींमध्ये नसलेले अर्ज विचारात घेतल्या जाणार नाही व त्याबाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

**८) अर्जदाराची शैक्षणिक पात्रता, अनुभव व वय हे अर्ज सादर करण्याच्या अंतिम तारखेपर्यंत ग्राहय धरण्यात येईल.**

९) इ-मेल किंवा फॅक्सद्वारे प्राप्त झालेले अर्ज रद्द समजण्यात येतील.

१०) अर्जाच्या छाननीअंती अर्जदार अपात्र ठरल्यास याबाबतची माहिती संबंधित अर्जदारास स्वतंत्ररित्या कळविली जाणार नाही.

११) उमेदवारांनी भरती प्रक्रियेत विद्यापीठाशी संबंधित अधिकारी व सेवकांवर कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दडपण तथा राजकीय किंवा सामाजिक दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास अथवा अप्रत्यक्ष संपर्क साधण्याचा प्रयत्न केल्यास, अशा उमेदवारांस अपात्र समजले जाईल.

१२) मुलाखतीस बोलाविलेल्या अर्जदारांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

१३) विद्यापीठ प्रशासनाद्वारे आयोजित मुलाखतीस पाचारण करण्यात येणाऱ्या संबंधित उमेदवाराची ठराविक दिवशी प्रशासनाच्या कोणत्याही अडचणीमुळे मुलाखत पार न पडल्यास अशा संबंधित उमेदवारांची प्रशासनाच्या निर्देशान्वये इतर दिवशी मुलाखत आयोजित करण्यात येईल व त्याकरिता मुलाखतीस संबंधीत उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

१४) निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीउपरांत उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे सादर केल्याचे किंवा माहिती लपवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची निवड/नियुक्ति तात्काळ रद्द करण्यात येईल व तो उमेदवार कायदेशीर कारवाईस पात्र होईल.

१५) पदाच्या संख्येत वाढ किंवा घट झाल्यास, जाहिरातीत बदल किंवा दुरूस्ती करण्याबाबत, तसेच संपूर्ण जाहिरात रद्द करण्याबाबतचे अधिकार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने राखून ठेवले आहे.

**कुलसचिव**
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ

*********************************************************************